“मागणी क्र.व्ही-२, ३४५१-सचिवालयीन आर्थिक सेवा (०९०) (०१) सचिवालयीन आर्थिक सेवा (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (दत्तमत) (३४५१ ०३०४) २८ व्यावसायिक सेवा” या लेखाशीर्षाखाली पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेल्या तरतूदीच्या वितरणाबाबत..........................

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.९११/१५स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: १६ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> :-

१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०.०६.२०१७.
३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.०८.०८.२०१७.
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.पुरक-२०१७/प्र.क्र.३३५/अर्थ-३, दि.२९.१२.२०१७.
५) शासन पत्र क्र.पुरक-२०१७/प्र.क्र.१२९/२०१७/१७स, दि.३०.१२.२०१७.
६) शासन निर्णय क्र.पुरक-२०१७/प्र.क्र.१२९/२०१७/१७स, दि.०१.०१.२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिकांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी अशा प्रकारच्या इतर राज्यात अस्तित्वात असणाऱ्या कायद्याचा अभ्यास करणे, तसेच कायदा संमत झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षापूर्वी लागू करण्यासंदर्भात इतर राज्यातील मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निकालाचा केस स्टडी करण्यासाठी तसेच संबंधित प्रकरणी शासनाची बाजू प्रभावीपणे मांडणे आवश्यक असल्याने तसेच प्रकरणाची तातडी लक्षात घेऊन जेष्ठ विधीज्ञ सदर प्रकरणी नियुक्ती करण्यात आली होती. सदर विधीज्ञ यांचे शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी रु.३३.८५ लक्ष इतक्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला होता. सन डिसेंबर-२०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रु.२१.९५ लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. सदर मंजूर तरतूदीपैकी ९०% इतका निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार रु.१९.७५ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

सदर बाब विचारात घेऊन, मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिकांमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी नियुक्त केलेल्या विधीज्ञ यांचे शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी सन डिसेंबर-२०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेली रु.१९.७५ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम वितरीत करण्याकरीता श्री.र.ग.बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच डॉ.सुदिन गायकवाड, उपसचिव (आस्थापना), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या “मागणी क्र.व्ही-२, ३४५१-सचिवालयीन आर्थिक सेवा (०९०) (०१) सचिवालयीन आर्थिक सेवा (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (दत्तमत) (३४५१ ०३०४) २८ व्यावसायिक सेवा” या लेखाशीर्षाखाली सन डिसेंबर-२०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.१८.०४.२०१७ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील लागू अटींची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाच्या दि.०८.०८.२०१७ रोजीच्या शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार पुढील बाबींची पूर्तता झालेली आहे :-

vii) विभागास प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार ज्ञापनात नमूद करण्यात आले आहेत.
viii) सन २०१७-१८ करीता डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये पूरक मागणीद्वारे मंजूर निधी रु.२१.९५ लक्ष इतका आहे.
ix) संक्षिप्त देयके प्रलंबित नाहीत.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७५/अर्थ-१३,दि.०५.०२.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१२५२१२२३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.02.16 13:30:02 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. वित्त विभाग (कार्यासन-व्यय-२/कार्यासन-अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई.
५. अवर सचिव (१७स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. कक्ष अधिकारी (कार्यासन-२स/कार्यासन-११स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कक्ष अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (कार्यासन १५स).